# महात्मा फुले एक राजकीय विचारवंत

**रेखा हिंगोले , शिंदे आर.डी.**
राज्यशास्त्र विभाग, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शंकरनगर, तात्र बिलोली जि. नांदेड (महाराष्ट्र)
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड ता. लोहा, जि. नांदेड (महाराष्ट्र)

**सारांश:**अर्वाचीन भारतातील पहिले सामाजिक प्रबोधन एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात घडून आले. एकविसाव्या शतकाच्या उंबरठयावर उभे असतांना आता दुस—या प्रबोधनाची पूर्वचिन्हे अधूनमधून दृश्टिक्षेपास येऊ घातलेल्या या दुस—या प्रबोधनाचे स्वरुप अधिक सर्वकश, व्यापक व मूलगामी राहणार आहे, यात शंका नाही. विशेष हे की, आगामी प्रबोधनाची प्रेरणा महात्मा जोतीराव फुले यांच्या पासूनच घ्यावी लागणार आहे. कारण जोतीरावांच्या विचारामध्ये सर्वस्पर्शी अशा क्रांतीची बीजे दडलेली आहेत, हे आता सर्वमान्य झालेले आहे. गरज आहे ती त्यांच्या कार्यक्षेत्रातील नवोन्मेश पैलू शोधण्याची, त्यांच्या विचारातील आशय नव्याने समजून घेण्याची वर्तमान नवप्रेरणांचे संदर्भ लक्षात घेऊन त्यांच्या विचारांतील उपयुक्ततेचा अर्थ लावण्याची, त्यासाठी ज्योतीरावांच्या विचारांचे पुनर्मूल्यांकन करुन त्यांची वर्तमान संदर्भयुक्तता (Relevance) सिध्द करण्याची.[1]

***प्रस्तावना :***

महात्मा जोतीराव फुले यांच्या विचार व कार्याचे ऐतिहासिक महत्व मान्य करुनही अनेक सारस्वत त्यांनी मांडलेल्या तत्वज्ञानाला एका निश्चित सामाजिक व राजकीय विचारश्रेणीचा दर्जा बहाल करीत नाहीत. कारण ज्या अर्थाने मार्क्सवाद, फासीवाद आणि गांधीवादाला एका निश्चित विचारवादाचे स्वरुप प्राप्त आहे. त्या अर्थाने ' फुलेवाद 'हा कांही विशिष्ट सामाजिक संदर्भात व राजकीय तत्वज्ञान व्यक्त करणारा विचारवाद नाही. फक्त एका विशिष्ट सामाजिक संदर्भात बदल घडवू पाहणारा तो एक भाबडा आशावाद होता, अशी त्यांची भूतिका होती. एकूण सर्वकश सामाजिक व राजकीय धारणेसाठी सुसंगत असा वैचारिक आकृतीबंध त्यांच्या विचारात नाही, असा त्यांचा या पाठीमागचा अधिक्षेप आहे. म्हणून अधिक्षेपकांच्या मते, 'फुलेवादाची ' एक वेगळी व स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी सैध्दांतिक चौकट सर्वप्रथम स्पष्ट करून दाखववाल लागेल.

***महात्मा फुले एक राजकीय विचारवंत :—***

" विचारप्रणाली या शब्दाचा सर्वप्रथम प्रयोग 18 व्या शतकाच्या शेवटी ' एन्टोयन लुई क्लाड डेस्टुट डी ट्रेसी '(1754—1836) या फ्रेंच विचारवंताने 23 मे 1797 रोजी केला. ट्रेसी यांनी विचारप्रणाली शब्दाचा प्रयोग विचाराने विज्ञान किंवा विचारांचे शास्त्र या अर्थाने केला आहे. "[2] 'विचारसरणी ' हा इंग्रजी ' फ्कमवसवहलश या शब्दाचा मराठी प्रतिशब्द. श्फ्कमवसवहलश हा शब्द मूळ ग्रीक फ्कमं व स्वहवे म्हणजे क्पेबवनतेम या शब्दांपासून बनलेला आहे. त्याचा मूळ अर्थ ' The science of ideas metaphysics abstract speculation, visionary speculation unproductive जीवनहीज' असा होतो. फुले केवळ चिंतनात्मक तत्वज्ञ नव्हते ही गोश्ट मान्य करावीच लागते. पण या संज्ञेचा आज रुढ झालेला अर्थ, ' Manner of thinking, ideas, characteristics of a person, group etc. esp. as forming the basis of economic or political system, bourgeosis, Marxist and to totalitarian ideologist' असा घेतला तर महात्मा जोतीराव फुले हयांच्या विचारांवर आधारलेली सामाजिक व राजकीय विचारसरणी मांडून दाखविता येणे शक्य आहे. नव्हे आगामी सर्वकश प्रबोधनासाठी ती एक अत्यावश्यक व अपरिहार्य अशी अट राहणार आहे. "[3]

राजेंद्र व्होरा व सुहास पळशीकर यांनी ' राज्यशास्त्र शब्दकोश ' या ग्रंथात, " आदर्श राजकीय व सामाजिक व्यवस्थेचे चित्र रंगवून तिचे समर्थन करणारी व ही व्यवस्था प्रत्यक्षात कशी आणता येईल या बद्दलची व्यूहरचना सांगणारी मूल्यव्यवस्था, राजकीय ध्येय, हेतू व उद्दिष्टये यांचा सम्मुच्चय म्हणजे विचारप्रणाली होय ", असा विचारप्रणालीचा अर्थ सांगितला आहे. यासंदर्भत महात्मा फुले यांच्या समग्र विचारांचा आलेख तपासून पाहता असे निदर्शनास येते की, महात्मा जोतीराव फुले हे आदर्श राजकीय व सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याच्या प्रकियेतील मूलव्यवस्था, राजकीय ध्येय, हेतू व उद्दिष्टये यासाठी वैचारिक संघर्ष छेडणारे एकमेवाद्वितीय राजकीय विचारवंत होते.

" जोतीरावांच्या समोर अन्यायाने भरडल्या गेलेल्या पण संख्येने बहुजन असलेल्या शूद्र, अस्पृश्य व स्त्रिया या तीन विभागांत तीन प्रश्न होते. काबाडकष्ट करणारे शूद्र, कुणबी दरिद्री व कर्जबाजारी का ?, महार, मांग वगैरे अतिशूद्र जाती अस्पृश्य का ? आणि स्त्रियांच्यावर पुरुशांचा जुलूम का ?या तीन विभागांवरील अन्यायाचे स्वरुप व त्यातून त्यांच्या मुक्तीचा मार्ग या विषयाभोवतीच त्यांचा लोकशाहीकरणाचा विचार घडला आणि तो अव्वल.अशा राजकीय स्वरूपात व्यक्त झाला. आपण असेही म्हणू शकतो की, त्यांनी समाज परिवर्तनाचा राजकीय आलेख मांडला. या आलेखात त्यांनी (1) ब्राह्मणांची जुलमी सत्ता व जनतेच्या पिळवणुकीचे स्वरूप, (2) त्याची कारणे व (3) अन्यायाचा बिमोड करण्यासाठी जुनी रचना मोडण्याचा व नवी रचना घडविण्याचा कार्यक्रम मांडला. हे करण्यासाठी आवश्यक असणा—या राजकीय आघाडीचा व इतर मुद्यांचा उहापोह केला. हा आलेख नीट समजावून घेण्यासाठी त्यांच्या परिवर्तनाच्या भुमिकेचे विश्लेषण करुन त्याचे स्वरुप निश्चित करणे आणि विसाव्या शतकातील त्यांच्या विकासक्रमाचा आराखडा रेखाटणे आवश्यक ठरते. "[4]

मूलतः महात्मा जोतीराव फुले हे क्रांतीकारी क्रांतिवीर होते. त्यांच्या कार्यामागील मूळ प्रेरणा समताधिष्ठीत सामाजिक संरचनेची निर्मिती हीच होती. समतेची संकल्पना हीच स्वाभाविकतः राजकीय संकल्पना आहे. तत्कालीन विषमतामूलक सामाजिक व्यवस्थेत सामाजिक आणि राजकीय हक्क नाकारलेल्या उपेक्षित घटकांसाठी नैसर्गिक हक्कांची आणि प्रतिष्ठेची बाजू आपल्या साहित्यकृतीतून मांडणा—या महात्मा जोतीराव फुले यांचे विचार राजकीय पैलूला स्पर्श करून जातात. हे कुण्याही राज्यशास्त्रज्ञांना नाकारता येत नाही. अन्य बाब अशी की, महात्मा जोतीराव फुले यांच्या राजकीय विचारांचा त्यांच्या धार्मिक विचारांशी साक्षात संबंध आहे. कारण जोतीरावांचा ज्या काळात जन्म झाला होता. त्या काळात राज्यशास्त्र आणि धर्मशास्त्र व त्यानुशंगाने येणारे राजकारण व धर्मकारण यात फरक केला जात नव्हता. किंबहुना राजकारण हा धर्मकारणाचा एक अविभाज्य भाग आहे. अशी त्याकाळी समजूत होती. एवढेच नव्हे तर परंपरेने बुध्दीवादी असलेल्या ब्राह्मण पुरोहितवर्गानी येथील बहुजन समाजाच्या जाणीवा बोथट करण्यासाठी स्वरचीत धर्मग्रंथाच्या आडून राज्यशास्त्र हा विशय पूर्णतः धर्मशास्त्राच्या दावणीला बांधला होता. त्यामुळे त्याला समाज परंपरेची मान्यताही मिळाली होती. परिणामी धर्मकारणाच्या प्रवाहाखाली राजकारणातील सामाजिक कसोटयांचा बळी दिला गेल्यामुळे धर्मकारणाने राजकारणाचे शोषण चालविले होते. धर्मकारणातील स्वर्ग—नर्क, पाप—पुण्य आणि मोक्ष यासारख्या असंख्य गुढवादी प्रश्नांमुळे राज्यशास्त्र किंबहुना राजकारणाची व्यावहारीक उपयुक्तताच नष्ट झाली होती.

वास्तविक भारतीय समाज व्यवस्थेचा इतिहास हा विषमता, शोषण व अन्याय यांनी ओतपोत भरलेला होता. या समाजव्यवस्थेला धर्मपरंपरेची मान्यताव समर्थन असल्यामुळे ती परिदृढ व अपरिवर्तनीय अशीच होती. कारण ही समाजव्यवस्था ईश्वरीय संकेतानुसार व माणसांच्या पुर्वकर्माने निर्माण झालेली आहे, असा सार्वत्रिक समज रूढ होता. ब्रिटीशांचे आगमन व त्यांच्या उदारवादी विचारांच्या प्रभावाने महात्मा जोतीराव फुले यांना या परिस्थितीची परखड जाणीव झाली आणि त्या जाणीवेतून निर्माण झालेल्या त्यांच्या विजिगिशु बंडखोरी वृत्तीने स्वधर्म (हिंदूधर्म) परंपरा आणि त्यातील अर्थकारणाचा तौलनिक अभ्यास करुन हिंदूधर्म परंपरेच्या बुरख्याआड लपलेला राजकीय पैलू उजेडात आणला. त्यामुळे त्यांची धर्मचिकित्सा हीच एक राजकीय चिकित्सा बनली. जिने भारतीय

राजकारणातील धार्मिक अंतरंगाचा आंतरपाट टराटरा फाडून टाकला. त्यामुळे महात्मा जोतीराव फुले यांचे राजकीय विचार त्यांनी केलेल्या हिंदूधर्म समिक्षेच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजेत, तरच त्यांची स्वतंत्ररितीने जाणीव होईल व त्या जाणीवेतून त्यांच्या राजकीय विचारांची एक स्वतंत्र सैध्दांतिक चौकट स्पष्ट होईल.

मुलतः " सत्यशोधक समाजात राजकीय विशयांवर बोलायला बंदी होती. म्हणून फुले यांना राजकीय विचारच नव्हते किंवा फुले हे राजकीय विचारवंत नव्हते, असे म्हणणे चूकीचे ठरेल. फुले काळात राजकीय विषयावर बोलणे म्हणजे इंग्रजांना ताबडतोबीने घालवून देण्याची चर्चा करणे असा अर्थ होता. फुले आणि त्यांचे अनुयायी इंग्रजांनी ताबडतोबीने जावे या मताचे नव्हते. कारण तसे झाले तर देशाची राजकीय सत्ता मूठभर ब्राह्मणाकडे जाऊन देशात परत एकदा ' पेशवाई ' येण्याचा धोका त्यांना वाटत होता. म्हणून त्यांचे राजकारणापासून अलिप्त राहणे हे एक प्रकारचे राजकारणच होते. हवे तर त्याला नकारात्मक राजकारण म्हणा. "[5] याच त्यांच्या नकारात्मक राजकारणात ऐतद्देशीय बहुजन समाजाचे कल्याण दडलेले होते. दुस–या शब्दात महात्मा जोतीराव फुले यांच्या नकारात्मक राजकारणात भारतातील कल्याणकारी राज्याचा ( Welfare state) उषःकाळ दडलेला होता. त्यामुळे त्यांच्या नकारात्मक राजकारणाची व्यूहरचना त्यांचे आदर्श सामाजिक व राजकीय व्यवस्थेचे निलचित्र (Bluprint) स्पष्ट करते, असेच सिध्द होते. ते तेंव्हाच सिध्द होते जेंव्हा त्यांच्याकडे निश्चित असा वैचारिक बेस असतो. तो जोतीरावांकडे होता हे वादातीत सत्य कुणालाच नाकारता येत नाही. " सत्तेवाचून सकळ कळा झाल्या अवकळा "[6] असा इशारा देणा–या फुल्यांना राजकीय विचार नव्हता असे म्हणणे अभ्यासकांनी स्वतःच्या अडाणीपणाचे प्रदर्शन करण्यासारखे आहे.

तथापि महात्मा जोतीराव फुले यांनी जाणीवपुर्वक एखाद्या सिध्दांताची मांडणी केलेली नाही. तार्किकदृष्टया त्यांनी आपले विचार एका विशिष्ट ग्रंथात शब्दबध्द केलेले नाहीत. त्यांचे विचार तत्कालीन समाज व राजकीय व्यवस्थेच्या चिंतनातून, विविध, ग्रंथातील लेखनातून आणि भाषणातून सार रुपाने व्यक्त झालेले आहेत. गांधीजीनी तात्विक चर्चेपेक्षा संपूर्ण मानवी सामाजिक जीवन हीच प्रयोगशाळा समजून आपल्यापुढे असलेल्या तत्वांचा पडताळा पाहून शाश्वत सत्य शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. तरीही त्यांच्या विचार आणि कृतीत आपणास तात्विक सुसंगती आणि सुत्रे शोधता येतात आणि त्यालाच आपण गांधीवाद असे म्हणतो.

अगदी त्याचप्रमाणे महात्मा जोतीराव फुलेंच्या विचारात आपणाला तात्विक सुसंगती आणि सुत्रे शोधता येवू शकतात. महात्मा जोतीराव फुले यांनी आपल्या सार्वजनिक जीवनांत महात्मा गांधीप्रमाणेच 'सत्य' या शाश्वत तत्वाला प्राथमिकता दिली. एवढेच नव्हे तर त्यांनी 'सत्य' या शाश्वत तत्वात ईश्वराचे (निर्मिकाचे) स्वरुप पाहिले. म्हणून त्यांनी आपल्या जीवनात 'सत्य' या तत्वाची कधीच प्रतारणा केली नाही. ' सत्यमेव जयते ' हा त्यांच्या जीवनाचा अनासक्त ध्येयवाद होता.

म्हणूनच त्यांनी 'सत्य' या शाश्वत सत्यावर आधारीत सामाजिक व राजकीय संरचनेची पूर्नबांधणी करण्यासाठी परिवर्तनाची चक्र गतीमान केली. परिवर्तनाचे हे चक्र सतत फिरते रहावे म्हणून महात्मा जोतीराव फुले यांनी जे तत्वज्ञान विकसीत केले, त्याला एकत्रितपणे आपणाला 'फुलेवाद' असे म्हणता येईल. स्वातंत्र्य, समता, बंधूता, न्याय आणि मानवतावाद ही पंचतत्वे 'फुलेवादाची' स्तंभ आणि सदाचरण, अहिंसा, प्रेम, शांती आणि धर्मनिरपेक्षता ही मानवी मूल्य उद्दिष्टये आहेत. या स्तंभ आणि उद्दिष्टांच्या आधारे मानवतेची प्रतिष्ठा जपणारा आदर्शवाद समाज आपणाला निर्माण करता येईल हे जोतीरावांचे स्वप्न होते कारण महात्मा जोतीराव फुले यांच्या काळात मानवी जीवन गंभीर अशा संक्रमण स्थित्यंतरातून वाटचाल करीत होते. आमची काही प्राचीन मूल्य (Traditional value) पूर्णतः कालवश झालेली होती तर काही तीव्र गतीने विघटीत होत होती. परंतु त्या सार्वजनिक जीवनांतील ब्रह्मवृंदाच्या सांस्कृतिक वसाहत वादामुळे त्या जागी नवीन मूल्य प्रस्थापित होत नव्हती. त्यामुळे मानवी जीवन जगण्यातच हरवले होते. त्यातच " ब्राह्मणो मम दैवम " म्हणजेच ज्ञानसर्वस्व अशी चूकीची धारण निर्माण झाल्यामुळे ज्ञानाची अन्य भौतिक व नैतिक क्षितीजे ओस पडली होती. त्यामुळे पारंपारिक संस्कृतीचे अभिजन (ब्रह्मवृंद) मान्य अनुबंध जोपर्यंत बदलत नाहीत. तोपर्यंत ' बहुजन हिताय बहुजन सुखाय ' अशी संस्कृती अस्तित्वात येणार नाही. अशी जोतीराव फुले यांची धारणा होती. ही धारणा नजरेसमोर ठेवून कदाचित जोतीरावांनी आदर्श अशा बळी राज्याचे चित्र रेखाटले. 1869 मध्ये त्यांनी लिहिलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पोवाडयातही हेच चित्र प्रतिबिंबित झाले आहे. या महामानवाच्या ठायी एक द्रष्टेपणा होता. प्रा. गं. बां. सरदार यांनी जोतीरावांच्या या द्रश्टेपणाचा गुणगौरव करताना म्हटले आहे, " भारतात पहिल्या महायुध्दानंतर साम्यवादी चळवळीचा आरंभ झाला, आणि तिच्यातून वर्गवादी विचारसरणीची लोकांना ओळख झाली. त्यांच्या जवळजवळ अर्धशतकापूर्वी कोणत्याही सैध्दान्तिक विचारप्रणालीचा वारसा न लाभलेल्या जोतीरावांना त्यांच्या सर्जनशील मानवतावादी दृष्टिकोणामुळे हिंदू समाजव्यवस्थेतील अंतर्विरोधाचे आकलन झाले. त्यांच्या जातिवंत द्रष्टेपणाचेच हे द्योतक म्हटले पाहिजे. "[7] यावरुन महात्मा जोतीराव फुले हे क्रांतीकारी क्रांतिवीरच नव्हे तर कृतिशील सुधारक राजकीय विचारवंत होते, हे अधोरेखित होते.

" कार्ल मार्क्सने समाजक्रांतीचे तत्वज्ञान आणि वैचारीक साहित्य निर्माण करण्यावर भर दिला, परिस्थितीच्या प्रवाहाला वेगळे वळण लावून लोकजीवनाचा प्रवाह अजिबात बदलून टाकायची परिस्थिती त्यांच्या जीवनकाळी नव्हती. तरीही आपण त्याला समाजक्रांतीकारी म्हणतो, हे महात्मा फुलेंचे समाज सुधारकपण वा समाजक्रांतीकारीपण ठरवतांना लक्षात ठेवले पाहिजे. "[8]

तत्कालीन प्रस्थापित समाजव्यवस्थेबद्दलचे आत्यंतिक असमाधान, 'त्यातून जन्माला आलेली बंडखोरी कृती, नवीन अनुभवांमधून होत असलेली जून्या विचारांची तपासणी व त्यावर आधारलेली नवीन कृती या प्रकारच्या प्रक्रियेतून महात्मा जोतीराव फुले हयांच्या कर्तृत्वपट आकाराला येतो. ही प्रक्रिया द्वंद्वात्मक (डायलेक्टिक ) म्हणून विलक्षण गतिशील व फलनिष्पत्ती देणारी आहे. तिची परिणामकारकता व संभवरार्भता (Potentiality) एवढी जबरदस्त आहे की, प्रत्येक नवीन युगात तिचे नवोन्मेश नवीन क्रांतीचे मार्गदर्शन करू शकतात. क्रांती ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. अशा क्रांत्यांची साखळी जन्माला घालण्याची शक्ती महात्मा जोतीराव फुलेंच्या राजकीय तत्वज्ञानात आहे.[9] त्यांच्या या तत्वज्ञानाला 'सत्यशोधक तत्वज्ञान' किंवा 'सत्यशोधक विचार' असेही म्हटले जाते. " विज्ञाननिष्ठा हा सत्यशोधक विचारांचा स्थायीभाव होता. बुध्दिसंगत आणि तर्कसंगत पध्दतीने विचार करणा–या समाजाचे सत्यशोधक विचारवंतांनी ' स्वप्न ' रंगविले होते. माणसाची संशोधनबुध्दी जागावी आणि तिने सत्याचा ठाव घ्यावा, वस्तुनिश्ठ जग, त्यातील वस्तु आणि परिस्थितीचे कोडे उलगडावे व मानवी जीवन वस्तुनिष्ठ ज्ञानाने ओतप्रोत भरुन टाकावे असे त्यांना वाटत होते. त्यांनी विज्ञानाच्या, विशेषतः भौतिकशास्त्रांच्या प्रगतीचे जोरदार स्वागत केले आणि विज्ञानाची कास धरण्याचे बहुजनाला आव्हान केले. दुसरीकडे त्यांनी ब्राह्मणी व्यवस्थेची कठोर चिकित्सा केली आणि तिचे पितळ उघडे पाडले. जुनाट आणि जीर्णशीर्ण पोथ्यांची पाने फाडून त्याजागी नव्या ज्ञानग्रंथाची रचना केली. सत्यशोधक ज्ञानाच्या व सत्याच्या सिध्दांताने अशी दुहेरी कामगिरी बजावली आणि तत्वज्ञानाच्या जगात आपले वैशिष्टयपूर्ण स्थान निर्माण केले." 10 शाश्वत किंवा चिरंतन 'सत्य'(Truth) हे त्यांच्या तत्वज्ञानाचे 'साध्य' आणि 'स्वातंत्र्य' (Liberty) हे साधन होते. म्हणूनच त्यांनी 'सत्या'च्या प्रस्थापनेसाठी स्वातंत्र्याच्या क्षेत्रात सत्यशोधक समाज व वाड.मय निर्मितीतून एक फार मोठी आघाडी उघडावी. महात्मा फुले एका अखंडात म्हणतात,

" ।। सत्य सर्वांचे आदी घर ।। सर्व धर्मांचे माहेर ।।ध्रु.।।
।। जगांमाजी सुख सारें ।। खास सत्याचीं ती पोरें ।।
।। सत्य सुखाला आधार ।। बाकी सर्व अंधकार ।। "[11]

यावरून असे स्पष्ट होते की, सत्याचा निरंतर शोध घेणे आणि त्याचा पाठपुरावा करणे हेच मानवी जीवनाचे प्रथम आणि अंतिम लक्ष्य असले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. परंतु त्यासाठी लागणा–या 'साधनांचीच ' येथे बंदी होती. ती बंदी महात्मा फुले यांनी सर्वात प्रथम आपल्या ' गुलामगिरी', 'शेतक–याचा असूड', 'ब्राह्मणांचे कसब, 'जातिभेद विवेकसार'', 'सार्वजनिक सत्यधर्म', 'अखंडादीकाव्यरचना', 'इशारा', आदि ग्रंथातून आव्हेरली आणि येथील स्त्रीशूद्रातिशूद्र यांना मोकळा श्वास उपलब्ध करुन दिला. गुलामगिरी मग ती कोणत्याही प्रकारची वा स्वरूपाची असो ती अमानवीयच असते, असे जोतीराव फुले यांनी जगाला ठणकावून सांगितले. गुलामगिरी या ग्रंथाचे शीर्षक आणि अर्पणपत्रिका इंग्रजी व मराठी भाशेत आहे. त्याचप्रमाणे या ग्रंथाची प्रस्तावना ही देखील इंग्रजी व मराठी भाशेतच आहे. या इंग्रजी प्रस्तावनेचा प्रारंभच जोतीराव फुले यांनी 'होमर' यांच्या सुप्रसिध्द वचनाने केला आहे. " The day that reduces a man to slavery takes from him that half of his virtues."[12] याचा अर्थ असा आहे की, " ज्यादिवशी मनुष्य गुलाम होतो त्याचदिवशी त्याचे अर्धे सद्गुण हिरावून घेतले जातात. " गुलामी किंवा दास्यत्व किती वाईट आहे, हे या वचनावरुन स्पष्ट होते. या देशातील शूद्रातिशुद्र हे तर शेकडो वर्षावासून ब्रह्मवृंदाच्या अमानवी 'कसबा' मुळे गुलामगिरीत खितपत पडले होते. त्यामुळे त्यांना या गुलामीतून बाहेर काढून त्यांना 'माणूसपण'(स्वातंत्र्य) बहाल करणे हे जोतीराव फुले यांनी आपल्या चळवळीचे मध्यवर्ती उद्दिष्टये बनविले. आपल्या समाजकार्याचा हेतू विषद करताना महात्मा फुले 'गुलामगिरी' या ग्रंथातील प्रस्तावनेत, असे स्पष्ट करतात की, " ज्याची त्यास स्वतत्रता देवून त्यास

जुलमी लोकांचे अन्यायी जुलमापासून सोडवून सुखी करणे हाच काय तो त्यांचे (समाजसुधारकांचे) धाडसाचे ;जिवावरचे व धोक्याचेद्ध कार्य आहे. ''[13] असे असतानाही महात्मा जोतीराव फुले यांनी हे काम आपल्या शिरावर घेतले, यातून त्यांचा सुधारक क्रांतीकारकपणा सिध्द होतो. महात्मा फुले यांचा मुख्य भर मानवी हक्कांवर (Human Rights) होता. ' मानवी हक्काची '(Human Rights) संकल्पना ही मानवी जीवन व मानवी प्रतिश्ठेशी निगडीत असते. म्हणून हक्क आणि प्रतिश्ठा या दृष्टिने सर्व मानव मात्र समान आहेत. त्यामुळे प्रत्येक मानवाच्या ठायी नैतिकदृष्टया हे हक्क अविभाज्यपणे व स्वाभाविकपणे असले पाहिजे, अशी महात्मा फुले यांची प्रामाणिक धारणा होती.

मानवी हक्कांच्या अभिमुखतेचा अभाव हेच दास्यांच्या दास्यत्वाचे प्रमुख कारण आहे, असे सांगताना ते म्हणतात,

'' मानवाचे हक्क सर्वांसा कळता ।।
मग कोण त्राता ।। आर्य भटा ।।''[14]

तात्पर्य गुलामाला गुलामिची जाणीव होताच तो बंड करुन उठेल असा महात्मा जोतीराव फुले यांचा होरा होता. तो शिक्षणाशिवाय साध्य होवू शकत नाही. याची जाणीव जोतीरावांना झाली होती. शिक्षण हा केवळ ज्ञान संपादन करण्याचा मार्ग नव्हे तर तो सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि धार्मिक अशा मानवी जीवनातील महत्वपूर्ण घटकांच्या विचाराचा मार्ग आहे. ती एक फार मोठी भौतिकशक्ती आहे. ती भौतिकशक्ती संपादन केल्याशिवाय स्त्री शुद्रातिशूद्रांच्या उन्नतीचा मार्ग खुला होऊ शकत नाही किंवा संपन्न जीवनाची जाणीव त्यांना होवू शकत नाही, असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी '' विद्या शिकताच पावाल ते सुख । घ्यावा माझा लेख । जोती म्हणे ।। ''[15] असा स्त्री शुद्रातिशूद्रांना उपदेश करुन येथील सर्वच प्रकारच्या गुलामगिरीविरुध्द निशान फडकावले. एवढेच नव्हे तर अमेरिकन निग्रो गुलामगिरीविरुध्द लढणा–या सदाचारी लोकांना त्यांनी आपले 'गुलामगिरी' हे पुस्तक अर्पण केले आणि अमेरिकन सदाचारी लोकांचा कित्ता आपल्या देशबांधवांनी आपल्या देशातील शूद्रबांधवास ब्राह्मण लोकांच्या दास्यत्वापासून मुक्त करण्याच्या कामात घ्यावा अशी आशा व्यक्त केली. यावरुन स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या नवमूल्यांची ग्वाही देणारा व त्यासाठी आग्रह धरणारा 'गुलामगिरी' हा ग्रंथ यासाठीच अत्यंत मोलाचा आहे. एका अर्थाने तो भारतीय शुद्रातिशूद्रांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामाच आहे. तर ' शेतक–याचा असूड ' हा ग्रंथ कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेला गतीमानता (Dynamic) प्राप्त करुन देणारा आहे. ॲडमस्मिथ सारख्या अर्थशास्त्रज्ञांप्रमाणे अर्थशास्त्रीय परिभाशेमध्ये महात्मा जोतीराव फुले यांनी 'शेतक–याचा असूड' या ग्रंथात ताळेबंद स्वरुपात आर्थिक प्रश्नांचा विचार केलेला नसला तरीही त्यांच्या या वाड.मय निर्मितीमागील मुख्य प्रेरणा कल्याणकारी राज्याची स्थापना हीच होती. त्यांची सार्वजनिक सत्यधर्माची संकल्पना ही एक विशिष्ट धर्म, संप्रदाय वा मुलतत्ववाद जोपासणारी नव्हे, तर आंतरराष्ट्रीयवादाशी बांधिलकी मानणारी सनदच आहे.

महात्मा जोतीराव फुले यांनी जगातील सर्वधर्मांचा प्रथमतः समीक्षात्मक पध्दतीने अभ्यास केला आणि त्यांच्या असे लक्षात आले की, जगातील सर्वधर्म अपूर्ण आहेत. एवढेच नव्हे तर कोणताही धर्म ईश्वर प्रणीत नाही. कोणताही धर्मग्रंथ देवनिर्मित नाही, या पृथ्वीच्या पृष्ठभागावर जेवढी म्हणून मानवांनी निर्मिलेली धर्मग्रंथ आहेत, त्यापैकी एकाही धर्मग्रंथात आरंभापासून शेवटपर्यंत सार्वजनिक सत्य नाही, चातुर्वर्ण्य, वर्गभेद वा जातिभेद हया संस्था देवनिर्मित नाहीत, त्या मनुष्यनिर्मित आहेत, ही सत्ये त्यांनी त्या काळी मोठया धैर्याने पुढे मांडली आणि धर्मांच्या संदर्भात काही प्रश्न उपस्थित केले, ज्याचे शास्त्रीय पध्दतीने (खंडन) उत्तर जगातील कोणताही धर्मगुरु देऊ शकला नाही.

एक सुर्य सर्वां प्रकाश देतो ।। उद्योगा लावतो ।। प्राणीमात्रा ।।
किंवा
एक चंद्र नित्य भ्रमण करीतो ।। सर्वां सूख देतो ।। निशी दिनीं ।।
किंवा
पाणी तेंच गोड मेघ । योगें होतें ।। संतोषी करीतें ।। सर्व प्राण्यां ।।
मानवांचे साठी बहु धर्म कसे मग ।। झालां कां हो पिसे ।। जोती म्हणजे ।।[16]
निर्मीकाचा धर्म सत्य आहे एक । भांडणे अनेक कशासाठीं ?।।[17]

वेगवेगळया धर्मांना मानणा–या लोकांनी एकाच कुटूंबातील स्त्री–पुरूशांसारखे एकत्रितपणे सुख समाधानाने का नांदु नये ?

'' खिस्त महंमद मांग ब्राह्मणांशी । धरावे पोटाशीं । बंधुपरी ।।''[18]

हा महात्मा फुले यांचा विचार विश्वबंधुत्वाचीच साक्ष देतो. जगाला विभिन्न अशा धार्मिक मुलत्तत्वाची नव्हे, तर विश्वबंधुत्वाची ख–या अर्थाने गरज आहे. विश्वबंधुत्ववाद हाच मानवमुक्तीचा शाश्वत मार्ग आहे, ही जाणीव लक्षात घेवूनच महात्मा जोतीराव फुले यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म 'नावाची पुस्तिका लिहीली. ही छोटेखाणी पुस्तिका जगाला मानव मुक्तीचा महान संदेश देणारा ज्ञानकोशच आहे. मानवी मनाला बंदिस्त करणा–या प्रत्येक सामाजिक संस्थेवर त्यात त्यांनी टीकास्त्र सोडून त्या जागी अंमलात आणावयाच्या पर्यायी सामाजिक संस्थाची तरफदारी केली आहे. बुध्दिप्रामाण्यवाद, धर्माचे समाजशास्त्रीय विश्लेषण आणि इहवादी दृष्टिकोन ही त्रिसुत्री त्यांच्या पर्यायी सामाजिक संस्थेची आधारशिला आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि सहिष्णुता अशा पंचतत्वावर अधिष्ठीत अशी इहवादी विचारप्रणाली त्यात विकसीत करुन, शब्दप्रामाण्यवाद, अवतारवाद व दैववादाला आव्हान दिले. यासंदर्भात जोतीराव काही प्रश्न उपस्थित करतात.

'' जप–अनुष्ठाने पाऊस पाडीती । आर्य कां मरती । जळावीण ?''
किंवा
जप–अनुष्ठाने स्त्रिया मुलें होती ।। दुजा का करीती ।। मुलांसाठी ?।।
भट ब्राह्मणांत बहु स्त्रिया वांझ ।। अनुष्ठानीं बीज ।। नाही का रे ?।।
अनुष्ठानावीण विध्वा मुलें देती ।। मारुनी टाकीती ।। सांदीकोनी ।।[19] असे का ?

हे सगळेच प्रश्न ईहवादी म्हणजे शास्त्रीय असून चमत्कार, किंवा मंत्रतंत्रातून मानवी मनाच्या परिपूर्ततेची आश्वासने देणा–यांना त्यांची उत्तरे आजही देता येत नाहीत.

अर्थात तर्क आणि विवेकाच्या निकशांवर आधारीत जे जे मानवासाठी हितकारक ते ते उपयुक्त अशा उपयुक्त गोष्टींचा स्वीकार करुनच मानवाने आपले कल्याण साध्य केले पाहिजे, अशी जोतीरावांची रास्त उपयुक्ततावादी अपेक्षा होती.

महात्मा फुले यांच्या वाड.मयाचे प्रयोजन लोकरंजन, संपत्ती, कीर्ती हे नव्हते. आत्मनिष्ठा स्वान्तः सुखायवादी लेखक ते नव्हते. '' शुद्रातिशूद्र स्त्रीपुरुश, कष्टकरी समाज आणि माणूस हा साहित्याचा नायक आणि केंद्रबिंदू झाला पाहिजे, त्याचे वास्तव जीवनानुभव उत्कटपणे साहित्यात प्रतिबिंबित झाले पाहिजे. सर्वसामान्य माणसाला समाजात व साहित्यात प्रतिश्ठा वा सन्मान प्राप्त झाला पाहिजे, ही महात्मा फुले यांची स्पष्ट भूमिका होती. ''[20] याच जाणीवेतून त्यांनी ' ब्राह्मणांचे कसब', 'सत्सार', 'जातिभेद विवेकसार', 'अस्पृश्यांची कैफियत' आदी ग्रंथातून कष्टकरी समाजाचे नायकत्व केले. त्यांचे 'तृतीयरत्न नाटक' हे तर पारंपारीक अन्याय व विषमतामूलक व्यवस्थेविरुध्दच्या जाणीवेचा व्यक्त हुंकारच होता. ज्या धर्मात व धर्मातील समाजात 'गंगेचे मुळ व ऋषीमुनीचे कुळ' शोधू नये असा दंडक होता. त्याच समाजातील विद्रोही बंडखोर अशा जोतीरावांनी ' गंगेचे मुळ व ऋषीमुनींचे कुळ' शोधण्याचा अत्यंत धाडसी प्रयोग केला. जातिव्यवस्थेच्या अनुस्यात असलेली श्रेष्ठ–कनिष्ठत्वाची कल्पना नाकारुन माणसाकडे केवळ माणूस म्हणून पाहण्याची दृष्टि जोतीरावांनी आम्हाला समर्पित केली. पराक्रम, शौर्य, बुध्दिमत्ता आणि कर्तुत्व सिध्द करण्यासाठी आवश्यक असलेले गुण जात आणि कर्मावर नव्हे तर कर्तुत्वावर अवलंबून असतात हा नवोन्मेश सिध्दांत त्यांनी मांडला, ते म्हणतात,

निर्मीके निर्मिला मानव पवित्र । कमीजास्त सूत्र । बुध्दीमध्यें ।।
पिढीजादा बुध्दी नाहीं सर्वांमधीं । शोध करा आधी । पुर्तेपणी ।। 21

हा विचार हिंदू समाज व धर्माच्या कक्षा ओलांडून समस्त मानव जातीच्या कल्याणाचा, असा कल्याणकारी विचार होता.

***सारांश :–***

महात्मा जोतीराव फुले यांनी सत्यशोधक विचारातून नव्या पिढीला समग्र क्रांतीचा एक नवा संदेश दिला. प्रस्तुत संदेशातून त्यांनी भावी पिढीला एक चतुःसुत्री कार्यक्रम दिला. '' सामाजिक न्याय, समता, शिक्षण व ज्ञान मिळविण्याचा अधिकार आणि पददलितांची विशेषतः शेतक–यांची आर्थिक पिळवणूकीतून मुक्तता ही चतुःसुत्री जोतीरावांच्या सामाजिक क्रांतीची गाभा होती. ''[22]

जोतीरावांनी जे जे विचार व्यक्त केले, ज्या सामाजिक सुधारणा सुचविल्या व अंमलात आणल्या, ज्या–ज्या संस्था त्यांनी स्थापन केल्या त्या सर्वांतून पुढेमागे या देशात त्यांच्या विचारांचे, कृतींचे व उद्दिष्टांचे संस्थीकरण झाले. भारतीय राज्यघटना, राज्यघटनेची प्रस्तावना, त्यातील अनेक कायदे व राज्याची नीतिनिर्देशक तत्वे ही जोतीरावांच्या राजकीय विचारांचीच फलनिष्पती आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत विचारपूर्वक व गांभीर्याने महात्मा

जोतीराव फुले यांचे राजकीय तत्वज्ञान राज्यघटनेच्या माध्यमातून अत्यंत तपशिलवारपणे शब्दबध्द केले आहे. ही राज्यघटना पूढील कित्येक काळातील पिढीसाठी दीपस्तंभासारखी मार्गदर्शक म्हणून उभी आहे.

***संदर्भ सूची***

1.हरी नरके, महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, प्रकाशक प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती, 2006, पृ. 181.
2.प्रा. संतोष पाटील, राजकीय विचारप्रणाली, शुभम प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती, 12 ऑक्टोबर 2005, पृ. 3, 4.
3.हरी नरके, महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, प्रकाशक प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती, 2006, पृ. 182.
4.हरी नरके, महात्मा फुले शोधाच्या नव्या वाटा, प्रकाशक प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पाचवी आवृत्ती, 2006, पृ. 83, 84.
5.कित्ता, पृ. 54.
6.कित्ता, पृ. 11.
7.महात्मा जोतिबा फुले स्मृतिशताब्दी विशेषांक, जीवन शिक्षण प्रकाशन, शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, पहिली आवृत्ती, ऑगस्ट–सप्टेंबर 1990, पृ. 31.
8.हरी नरके, महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, प्रकाशक प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती, 2006, पृ. 128.
9.कित्ता, पृ. 182.
10.मनोहर पाटील, फुले–आंबेडकरी चळवळीचे क्रांतिशास्त्र, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जून 2010, पृ. 75.
11.धनंजय कीर, सं.गं. मालशे आणि य.दि. फडके, महात्मा फुले समग्र वाड.मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती, नोव्हेंबर 2006, पृ. 457.
12.कित्ता, पृ. 127.
13.कित्ता, पृ. 139.
14.धनंजय कीर, सं.गं.मालशे आणि य.दि. फडके, महात्मा फुले समग्र वाड.मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती, नोव्हेंबर 2006, पृ. 577.
15.डॉ. अशोक नाईकवाडे, युगप्रवर्तक महात्मा फुले, गौरवग्रंथ, विद्याभारती प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती, 15 ऑगस्ट 2012, पृ. 74.
16.धनंजय कीर, सं.गं. मालशे आणि य.दि. फडके, महात्मा फुले समग्र वाड.मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती, नोव्हेंबर 2006, पृ. 568.
17.कित्ता, पृ. 24.
18.कित्ता, पृ. 24.
19.कित्ता, पृ. 567.
20.डॉ. हर्षानंद खोब्रागडे, डॉ. प्रमोद गारोडे, महात्मा फुल्यांचे विचार, देवयानी प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, 2001, पृ. 23.
21.धनंजय कीर, सं.गं.मालशे आणि य.दि.फडके, महात्मा फुले समग्र वाड.मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संकृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती, नोव्हेंबर 2006, पृ. 24.
22.हरी नरके, महात्मा फुले शोधाच्या नव्या वाटा, प्रकाशक प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पाचवी आवृत्ती, 2006, पृ. 141